www.gauravprakashan.com

# गौरव प्रकाशन

कार्यकारी संपादक : गौरव धवणे

RNI NO. MAHMAR/2010/35320 | संपादक : बंडूकुमार धवणे | Postal Reg. No. ATI/RNP/259/2022-2024

वर्ष १७ ◆ अंक २१ ◆ अमरावती ◆ गुरूवार, दि.१० ते १६ सप्टेंबर २०२६ ◆ पृष्ठ ४ ◆ किंमत २ ₹ ◆ Email: gauravprakashan1@gmail.com

## आता जमिनींच्या खरेदी-विक्री व इतर व्यवहारांसाठी एकच एकात्मिक डिजिटल प्रवेशद्वार : बावनकुळे

मुंबई : राज्यात सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. राज्यात गुंतवणूक आणि आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी महाभूमी स्टॅक प्रणाली विकसीत करण्यात आली आहे. आता जमिनींच्या खरेदी-विक्री व इतर व्यवहारांसाठी एकच एकात्मिक डिजिटल प्रवेशद्वार तयार करण्यात आलं आहे. विखुरलेल्या विविध प्रणालींचे एकत्रीकरण करून दहा प्रमुख भूमी सेवांसाठी ही एकच प्रणाली कार्यान्वीत असणार आहे. याबाबत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माहिती दिली आहे. या प्रणालीमध्ये ३.५ कोटींपेक्षा जास्त ७/ १२ व ८-अ उतारे असणार आहेत. एकाच क्लिकवर तब्बल दीड कोटी भू-नकाशे, ४० कोटी जुने फेरफार आणि नोंदणी दस्त उपलब्ध असणार आहेत. 'ईज ऑफ लिव्हिंग' आणि 'ईज ऑफ डुईंग बिझनेस'ला प्रोत्साहन देणारा हा महसूल विभागाचा महत्त्वाचा टप्पा आहे, नागरिकांना जमिनीचा सर्च रिपोर्ट आणि इतर सर्व माहिती आता एका क्लिकवर मिळणार आहे, असं यावेळी बावनकुळे यांनी म्हटले आहे. दरम्यान वनपट्टे दाव्यांसाठी १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरपर्यंत ग्रामस्थरिय वनहक्क समिती दावे मंजूर करण्यासाठी बैठका घेणार आहे. याचा आदिवासी भागातील



शेतकऱ्यांना फायदा होईल, वनपट्टे दाव्यांना ग्रमासभेतच मंजुरी मिळणार आहे. ३० सप्टेंबर ते १ ऑक्टोंबर दरम्यान सुनावणी होवून या १५ दिवसांच्या मोहिमेत प्रलंबित वन पट्टे बहाल करण्यात येणार आहेत. हा देखील एक मोठा निर्णय मानला जात आहे. दरम्यान राज्यात गुंतवणूक आणि आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी महाभूमी स्टॅक प्रणाली विकसीत करण्यात आली आहे. यामुळे आता जमिनीचे सर्व व्यवहार एकाच छताखाली होणार आहेत.

या प्रणालीमध्ये ३.५ कोटींपेक्षा जास्त ७/ १२ व ८-अ उतारे असणार आहेत. तसेच एकाच क्लिकवर तब्बल दीड कोटी भू-नकाशे, ४० कोटी जुने फेरफार आणि नोंदणी दस्त उपलब्ध असणार आहेत, याचा मोठा फयदा शेतकऱ्यांना होणार आहे. शेतकऱ्यांना सहज सर्व सुविधा उपलब्ध होणार आहेत. सरकारने हा मोठा निर्णय घेतला आहे. यामुळे व्यवहारामधील अनेक अडचणी दूर होणार आहेत

## ११ ते १४ सप्टेंबर विदर्भ-मराठवाड्यात पाऊस

पुणे: यंदा राज्यात सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला होता. त्यात आता राज्यात पावसाची तब्बल १६ टक्के तूट झाली आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात पावसाने पाठ फिरवल्याचे चित्र आहे. या भागांमध्ये अपेक्षेप्रमाणे पाऊस न झाल्याने शेतकरूयांचे मोठे नुकसान झाले आहे. ऑगस्ट महिन्यात तर जवळपास ७० टक्के पावसाची तूट नोंदवण्यात आली आहे. दरम्यान, ११ ते १४ सप्टेंबरदरम्यान पश्चिम- मध्य बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विदर्भ आणि मराठवाड्यात काही भागांमध्ये पावसाची शक्यता निर्माण झाली आहे. कृत्रिम पाऊस पाडण्यासाठी विशिष्ट आणि योग्य स्थितीतील ढग असणे आवश्यक असते.

## गणेश विसर्जनासाठी महापालिकेकडून जय्यत तयारी

### आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांच्याकडून छत्री तलाव व प्रथमेश तलावाची पाहणी; सुविधा आणि सुरक्षेच्या दृष्टीने विभागांना तातडीचे निर्देश

अमरावती : आगामी २५ सप्टेंबर रोजी होणाऱ्या गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिकेने तयारीला वेग दिला आहे. शहरातील प्रमुख विसर्जनस्थळी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होणार असल्याने स्वच्छता, सुरक्षा, वाहतूक, प्रकाश व्यवस्था, अग्निशमन, सीसीटीव्ही, पार्किंग तसेच नागरिकांच्या मूलभूत सुविधांच्या दृष्टीने विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

याच अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी आज, बुधवार, दि. ९ सप्टेंबर रोजी छत्री तलाव व प्रथमेश तलावाची प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून तयारीचा आढावा घेतला.यावेळी पूर्व झोन क्रमांक ३ चे सहायक आयुक्त नितीन बोबडे यांनी गणेश विसर्जनासाठी करण्यात येत असलेल्या नियोजनाची सविस्तर माहिती आयुक्तांना दिली. यंदा गणेश विसर्जनाचा कार्यक्रम पाच दिवस चालणार असल्याने या कालावधीत विसर्जनस्थळी भाविकांची होणारी गर्दी, वाहनांची संख्या आणि सुरक्षेची आवश्यकता लक्षात घेऊन सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या.

विसर्जनासाठी येणाऱ्या नागरिकांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी विसर्जनस्थळी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले. यामध्ये स्टेजची



उभारणी, मोबाईल टॉयलेट, स्वच्छता व्यवस्था, पार्किंग सुविधा, सीसीटीव्ही कॅमेरे, अग्निशमन यंत्रणा तसेच परिसरातील अतिक्रमण हटविणे आदी बाबींचा समावेश आहे.

#### सुरक्षा व वाहतूक व्यवस्थेवर विशेष भर

विसर्जनस्थळी मोठ्या प्रमाणावर नागरिकांची गर्दी होत असल्याने सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे योग्य ठिकाणी बसविण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच विसर्जनाच्या ठिकाणी अग्निशमन विभागाची आवश्यक यंत्रणा आणि मनुष्यबळ सज्ज ठेवण्याच्या सूचनाही करण्यात आल्या.

गणेश विसर्जनस्थळापासून दस्तुरनगर चौकापर्यंत प्रकाश व्यवस्था सक्षम करण्याचे निर्देश आयुक्तांनी विद्युत विभागाला दिले. विसर्जनासाठी येणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या मार्गावर आवश्यक त्या ठिकाणी कॅमेरे बसविण्याचेही निर्देश देण्यात आले.

विसर्जनाच्या काळात रात्रीच्या वेळीही मोठ्या प्रमाणात भाविक व वाहनांची वर्दळ राहणार असल्याने रस्त्यांवर पुरेसा प्रकाश असणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रकाश व्यवस्थेची पाहणी करून आवश्यक त्या ठिकाणी अतिरिक्त दिवे लावण्याचे निर्देश देण्यात आले.

#### दस्तुरनगर चौक ते राजापेठ रस्त्यावरील पॅचवर्क तातडीने करण्याचे निर्देश

विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर शहरातील प्रमुख मार्गांची दुरुस्ती करण्यावरही आयुक्तांनी भर दिला. दस्तुरनगर चौक ते राजापेठपर्यंतच्या रस्त्यावर आवश्यक त्या ठिकाणी पॅचवर्क करण्याचे निर्देश संबंधित विभागाला देण्यात आले. गणेश विसर्जनासाठी मोठ्या प्रमाणात वाहतूक होणार असल्याने रस्त्यांवरील खड्डे व खराब झालेली ठिकाणे वेळेत दुरुस्त करून वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना करण्यात आल्या.विसर्जन मार्गावर तसेच तलाव परिसरात नागरिकांची आणि वाहनांची गर्दी लक्षात घेऊन वाहतुकीला अडथळा ठरणारे अतिक्रमण तातडीने हटविण्याचे निर्देश अतिक्रमण विभागाला देण्यात आले. भाविकांना सुरक्षितपणे ये-जा करता यावी आणि वाहतुकीची कोंडी टाळता यावी, यासाठी मार्ग मोकळा ठेवण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

#### स्वच्छता व आरोग्य व्यवस्थेला प्राधान्य

गणेश विसर्जनाच्या पाच दिवसांच्या कालावधीत तलाव परिसरात मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी होणार असल्याने स्वच्छता व आरोग्य व्यवस्थेवर विशेष लक्ष देण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. मोबाईल टॉयलेटची व्यवस्था, नियमित साफसफाई, कचरा संकलन तसेच विसर्जनस्थळाचा परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन आरोग्यविषयक कोणतीही समस्या उद्भवल्यास तत्काळ मदत मिळावी, यासाठी संबंधित यंत्रणांनी आवश्यक तयारी ठेवावी, अशाही सूचना देण्यात आल्या.

गणेश विसर्जनस्थळी सुरक्षेच्या दृष्टीने अग्निशमन विभागाची भूमिका महत्त्वाची असल्याने आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याच्या सूचना मुख्य अग्निशमन अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

## केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या ८ व्या वेतन आयोगात जुना नियम बदलणार

नवी दिल्ली : केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. आठव्या वेतन आयोगामध्ये ४० वर्षे जुना नियम बदलण्याची शक्यता आहे. याचा फायदा सेवानिवृत्त केंद्रीय कर्मचाऱ्यांना होणार आहे. सध्या केंद्रीय कर्मचारी आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशींची वाट पाहत आहेत. कर्मचारी संघटनांनी वेतन आयोगाकडे वेगवेगळ्या मागण्या केल्या आहेत. अशीच एक मागणी निवृत्तीवेतनधारकांनी देखील केली आहे. त्यांची ही मागणी पूर्ण झाल्यास सेवानिवृत्त झालेल्या केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी लागू असलेला ४० वर्षे जुना नियम बदलेल आणि त्यांना फायदा होईल.

केंद्र सरकारच्या निवृत्तीवेतनधारक आणि कर्मचारी संघटनांची मागणी आहे की, मुदतपूर्व घेतलेल्या निवृत्तीवेतनाची पुनर्स्थापना करण्यासाठी असलेला १५ वर्षांचा कालावधी कमी करण्यात यावा. अनेक संघटनांनी आठव्या वेतन आयोगाला शिफारस केली आहे की, हा कालावधी १० ते १२ वर्षांनंतर पुनर्संचयित केला जावा. त्यांनी असा युक्तिवाद केला आहे की, सध्याचा नियम अनेक दशके जुन्या आर्थिक आणि विमाशास्त्रीय गृहितकांवर आधारित आहे. १५ वर्षांचा कम्युटेड पेन्शनचा नियम १९८६ मध्ये लागू करण्यात आला होता. याचा अर्थ हा नियम ४० वर्षे जुना आहे. केंद्रीय सरकारी कर्मचारी सेवानिवृत्तीनंतर त्यांच्या मूळ पेन्शनच्या ४० टक्क्यापर्यंत रक्कम कम्युट करून ती एकरकमी घेऊ शकतात. त्याऐवढी कम्युट केलेला भाग त्यांच्या मासिक पेन्शनमधून कापला जातो. सध्याच्या नियमांनुसार, कापलेली पेन्शन १५ वर्षांनंतर पुन्हा सुरू केली जाते. कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारक संघटनांनी असा युक्तिवाद केला आहे की, जेव्हा ही प्रणाली लागू करण्यात आली होती तेव्हापासून आर्थिक आणि लोकसंख्याशास्त्रीय



काय करूं आतां धरूनिया भीड । नि:शंक हे तोंड वाजविले ।।
नव्हे जगीं कोणी । मुकीयांचा जाण सार्थक लाजून नव्हे हित ।।

कोणतीही चळवळ यशस्वी होण्यासाठी तिला वर्तमानपत्राची आवश्यकता असते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसेल तिची अवस्था पंख तुटलेल्या पक्ष्याप्रमाणे होते. – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## शेतकऱ्याचा सोबती; यंत्रयुगात बैल हरवला ?

*शेती आणि बैल यांचे नाते हे केवळ श्रमाचे नव्हे, तर शेतकऱ्यांच्या जीवनाशी आणि ग्रामीण संस्कृतीशी घट्ट जोडलेले आहे. पूर्वी बैलांशिवाय शेतीची कल्पनाच करता येत नव्हती. नांगरणीपासून पेरणीपर्यंत अनेक कामांसाठी बैल शेतकऱ्याचा विश्वासू साथीदार होता. मात्र, आधुनिक यांत्रिकीकरणामुळे ट्रॅक्टर, रोटाव्हेटर आणि विविध कृषी यंत्रांचा वापर वाढला असून शेतीतील बैलांचे महत्त्व झपाट्याने कमी होत आहे.यांत्रिकीकरणामुळे शेतीची कामे कमी वेळेत आणि कमी मनुष्यबळात पूर्ण होतात, हे निश्चितच त्याचे मोठे फायदे आहेत. मजुरांची कमतरता, वाढती मजुरी आणि वेळेची बचत यामुळे शेतकऱ्यांसाठी यंत्रांचा पर्याय अधिक सोयीचा ठरत आहे. परिणामी बैल पाळण्याचा खर्च, त्यांच्यासाठी लागणारा चारा आणि देखभाल यामुळे अनेक शेतकरी पशुधनापासून दूर जात आहेत. आर्थिक गणिताच्या दृष्टीने हा बदल स्वाभाविक असला, तरी त्याचे सामाजिक आणि सांस्कृतिक परिणामही दुर्लक्षित करता येणार नाहीत.बैल हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा घटक होता. शेणखताच्या माध्यमातून जमिनीची सुपीकता टिकविण्यातही पशुधनाची भूमिका महत्त्वाची होती. रासायनिक खतांचा वाढता वापर आणि यंत्रांवरील वाढते अवलंबित्व यामुळे शेतीच्या पारंपरिक पद्धती मागे पडत आहेत. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारताना पारंपरिक आणि पर्यावरणपूरक शेतीपद्धतींचे महत्त्वही जपणे आवश्यक आहे. यांत्रिकीकरणाला विरोध करण्यापेक्षा त्याचा समतोल आणि शाश्वत वापर कसा करता येईल, याचा विचार झाला पाहिजे.बैलांशी संबंधित सण, पोळा, ग्रामीण परंपरा आणि शेतकऱ्यांच्या भावविश्वात त्यांचे विशेष स्थान आहे. बैलांची संख्या कमी होणे म्हणजे केवळ एका प्राण्याचा शेतीतील सहभाग कमी होणे नव्हे, तर ग्रामीण जीवनशैलीतील एका मोठ्या अध्यायाचे हळूहळू लोप पावणे आहे. आजच्या पिढीला बैल आणि शेती यांचे नाते केवळ चित्रांमधून किंवा कथांमधून समजण्याची वेळ येऊ नये, यासाठी पशुधन संवर्धनाला प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.शेती आधुनिक झाली पाहिजे, यात दुमत नाही; मात्र आधुनिकतेच्या प्रवासात मातीशी आणि पशुधनाशी असलेले नाते तुटता कामा नये. लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी योग्य ठिकाणी बैलजोडीचा वापर आजही उपयुक्त ठरू शकतो. सरकारने पशुधन संवर्धन, चारा उपलब्धता आणि देशी वाणांचे जतन यासाठी प्रभावी धोरणे राबवावीत. ट्रॅक्टरच्या वेगासोबत बैलांच्या पावलांची आठवणही जिवंत ठेवणे ही केवळ परंपरेची नव्हे, तर शाश्वत शेतीच्या भविष्यासाठीची गरज आहे. बैलांची संख्या कमी होणे हा केवळ शेतीतील एका साधनाचा अंत नाही, तर ग्रामीण संस्कृतीतील एका महत्त्वपूर्ण परंपरेचा ऱ्हास आहे. पोळ्यासारख्या सणांमधून बैलांप्रती असलेली कृतज्ञता आणि शेतकऱ्यांचे भावनिक नाते व्यक्त होत असे. याशिवाय पशुधनामुळे शेणखत उपलब्ध होत असल्याने जमिनीची*

# शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न; कारणे



कर्जाचा वाढता भार, उत्पन्नातील अस्थिरता आणि शेतीमालाला मिळणारा अपुरा भाव हे शेतकरी आत्महत्या या प्रश्नाचे आर्थिक पैलू आहेत; पण त्याबरोबरच सामाजिक एकाकीपणा, कौटुंबिक ताण, सामाजिक-सांस्कृतिक दबाव आणि मानसिक आरोग्य समस्या यांचाही त्यात महत्त्वाचा वाटा असतो. त्यामुळे शेतकरी ज्या सामाजिक, आर्थिक आणि मानसिक परिस्थितीत जगतो, तिचाही विचार केला पाहिजे.

आज १० सप्टेंबर, जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या माहितीनुसार महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्यांची संख्या सर्वाधिक असल्याचे नमूद केले गेले आहे. महाराष्ट्रातही विदर्भ आणि मराठवाडा विभागात शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण सर्वाधिक आढळून आले असून, या प्रदेशाला आत्महत्याप्रवण क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले होते. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांपैकी बहुतांश शेतकरी अल्पभूधारक किंवा सीमांत शेतकरी आहेत.

एकूण कार्यरत भूधारणांपैकी अशा अल्प व सीमांत भूधारकांचे प्रमाण ८५.०१ टक्के आहे. प्रस्तुत लेखाचा उद्देश शेतकरी आत्महत्यांची कारणे आणि त्याचा उपाय यावर लक्ष केंद्रित करणे हा आहे. येथे एक महत्त्वाचा मुद्दा सर्वांच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे की, कृषी मजूर आणि शेतकरी/ कास्तकार यांच्या आत्महत्यांना सरसकट 'शेतकरी आत्महत्या' असे संबोधणे योग्य नाही. या दोन्ही सामाजिक- आर्थिक गटांमध्ये मूलभूत फरक आहेत आणि आत्महत्यांच्या कारणांचे विश्लेषण करताना हा फरक स्पष्टपणे लक्षात घेतला पाहिजे.

आत्महत्या ही बहुआयामी आणि अत्यंत गुंतागुंतीची सामाजिक घटना आहे. शेतकऱ्यांमधील आत्महत्यांचे सर्वंकष आकलन करण्यासाठी विविध स्तरांवर कार्यरत असलेल्या गुंतागुंतीच्या घटकांना समजून घेणे आवश्यक आहे. या घटकांचा अभ्यास करण्याचे दोन संभाव्य मार्ग आहेत.

पहिला मार्ग म्हणजे प्रत्यक्ष पद्धतीने मानस–सामाजिक घटकांचा अभ्यास करणे. यासाठी काही अभ्यासांमध्ये सर्वेक्षण आणि मुलाखतींच्या पद्धतींचा वापर करण्यात आला आहे. काळे, (२०११), दास (१९९८), मोहंती (२००१) आणि टाटा सामाजिक विज्ञान संस्था (२००५) यांच्या अभ्यासांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्येशी संबंधित मानसिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जोखमीच्या घटकांचे अधिक चांगले आकलन करून दिले आहे. या अभ्यासांमध्ये शेतकऱ्याच्या मृत्यूनंतर त्याच्या कुटुंबीयांकडून माहिती संकलित करण्यात आली.

या अभ्यासांनुसार कुटुंबातील शेतकऱ्याची भूमिका किंवा स्थान (उदा. कुटुंबप्रमुख असणे), तथाकथित सामाजिकदृष्ट्या तळच्या स्तरातील जात, कमी शैक्षणिक पातळी, गरिबी, वय आणि विभक्त/ लहान कुटुंबाची रचना हे मानसिक तणावाशी संबंधित महत्त्वाचे घटक असल्याचे आढळून आले आहे. बोंबले आणि लुंगडिम (ड्ढदृथ्र्ढथ्र रपव ङ्क्षह्वदृड्डत्थ्र्) (२०२०) यांच्या अभ्यासात शेतकऱ्यांमधील मानसिक तणावाची नोंद करण्यात आली आहे. या अभ्यासात ५८ टक्के शेतकऱ्यांनी मानसिक आरोग्याशी संबंधित तणाव असल्याचे सांगितले. डुर्खाईम (ऊीज्ञहशळा) यांच्या 'सुसाईड' या अभिजात समाजशास्त्रीय ग्रंथातून असे दिसून येते की, वर उल्लेख केलेल्या मानसिक परिणामांना केवळ वैयक्तिक मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून न पाहता समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अधिक चांगल्या प्रकारे समजून घेता येते. मोहंती (२०१३) यांनी वरील घटकांचे चिकित्सक विश्लेषण करताना असे नमूद केले आहे की, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांमधील निराशा आणि हताशेमागे शेतीच्या उत्पन्नातील घट आणि कर्जबाजारीपणा हे घटक असले तरी, त्यांची मुळे वाढत्या सामाजिक एकाकीपणात आणि व्यक्तिवादात आढळतात. असा दृष्टिकोन स्वीकारल्यास शेतकरी हा केवळ आर्थिक उत्पादन करणारा घटक नसून एक सामाजिक व्यक्ती म्हणून आपल्याला समजतो. बदलती सामाजिक व्यवस्था, सांस्कृतिक घटक आणि राज्याची धोरणे यांचा त्याच्या जीवनावर कसा परिणाम होतो, हे या दृष्टिकोनातून समजून घेता येते.

अप्रत्यक्ष परिणाम समजून घेण्याचा दुसरा मार्ग म्हणजे उपलब्ध संशोधनाच्या निष्कर्षांचे विश्लेषण करून अप्रत्यक्ष परिणामांचा शोध घेणे. दांडेकर (२००५), मिश्रा (२००६) आणि नारायणमूर्ती (२००६) यांसारख्या बहुतेक अभ्यासांच्या निष्कर्षांचे विश्लेषण केले असता, शेतकऱ्यांमध्ये आत्महत्येची प्रवृत्ती निर्माण करणारे प्रमुख घटक आर्थिक स्वरूपाचे असल्याचे दिसते. त्यानुसार उत्पादन खर्चाच्या तुलनेत पिकांना मिळणारा अपुरा भाव; कर्जबाजारीपणा; अनिश्चित मान्सूनमुळे होणारे पीकअपयश; उत्पन्नातील अस्थिरता या घटकांमुळे शेतकऱ्यांचा स्वाभिमान, आत्मविश्वास आणि आशावाद कमी होऊ शकतो आणि त्याचा त्यांच्या मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो.

शेतकरी ही एक सामाजिक व्यक्ती आहे आणि त्यामुळे तिला व्यापक सामाजिक आणि सांस्कृतिक व्यवस्थेच्या संदर्भात समजून घेणे आवश्यक आहे. विवाहव्यवस्था, हुंडा, कुटुंबातील सदस्यांच्या मृत्यूनंतरचे विधी, मुलांच्या शिक्षणाचा खर्च, अनपेक्षित वैद्यकीय खर्च तसेच मानसिक आरोग्याच्या समस्यांबाबतची जागरूकता आणि उपलब्ध मानसिक आरोग्य सेवा या बाबींचा पुरेसा अभ्यास झालेला नाही. हे घटक शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम करणारे संयुक्त किंवा पूरक घटक म्हणून कार्य करू शकतात.

**प्रतिबंधासाठी उपक्रम आणि धोरणे**

शेतकरी आत्महत्यांच्या समस्येच्या संदर्भात सरकारने अनेक अभ्यास केले असून, त्यातून तीन महत्त्वपूर्ण अहवाल प्रकाशित झाले आहेत. त्यातून कर्जमाफी योजना, कर्जमुक्ती पॅकेज आणि उत्पन्नाचे विविधीकरण यांसारख्या उपाययोजना पुढे आल्या. या अहवालांमध्ये आर्थिक घटकांना महत्त्व देण्यात आले; परंतु शेतकरी समुदायातील मानस–सामाजिक समस्यांचा किंवा या समस्यांचा आर्थिक परिस्थितीशी असलेल्या गुंतागुंतीच्या परस्परसंबंधाचा पुरेसा अभ्यास करण्यात आलेला नाही.

परिणामी, भारत सरकारच्या अहवालांमधून सहकारी बँकांच्या माध्यमातून कुटुंबांना सक्षम करणे, संस्थात्मक कर्जव्यवस्था मजबूत करणे आणि आर्थिक दरी कमी करणे यांसारख्या अर्थव्यवस्था–केंद्रित उपाययोजना सुचवण्यात आल्या. मात्र, या उपाययोजनांची अंमलबजावणी आणि त्यांचे परिणाम अपेक्षित पातळीवर झालेले दिसत नाहीत. परिणामी, शेतकरी कुटुंबांमधील आत्महत्येचा धोका कमी झाल्याचे ठोस पुरावे उपलब्ध नाहीत (काळे, २०१४).आतापर्यंत सरकारने केलेल्या उपाययोजनांचा मुख्य भर आर्थिक भार कमी करण्यावर राहिला आहे. मात्र इतर मानसशास्त्रीय, सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांचा धोरणात्मक आणि सातत्यपूर्ण पद्धतीने पुरेसा विचार झालेला नाही. याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र शासनाने वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन स्थापन केले. या मिशनच्या माध्यमातून आत्महत्याप्रवण भागांतील कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणाच्या निष्कर्षांनुसार, विविध कारणांमुळे आर्थिक अडचणींचा

## शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेमध्ये शिक्षक दिनानिमित्त पवित्र पोर्टलद्वारे निवड झालेल्या गणित विभागातील १८ विद्यार्थ्यांचा सत्कार




अमरावती : शिक्षक दिनाचे औचित्य साधून शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. यावेळी पवित्र पोर्टलच्या माध्यमातून विविध पदांवर निवड झालेल्या संस्थेच्या गणित विभागातील विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या सत्कार सोहळ्यात विपुल जाधव (जि.प. चंद्रपूर), शुभम खोडे (जि.प. यवतमाळ), नौशाद (मनपा नागपूर), सोनाली हिवऱाळे (कोल्हापूर), प्रिया निकम (जि.प. पालघर), आशिष जावरकर (अम. ट्रायबल), कल्याणी कडू (जि.प. पालघर), केतन मावसकर (अम. ट्रायबल), हरेकलाल जांभेकर (अम. ट्रायबल), साक्षी राऊत (जि.प. अमरावती), मनस्वी बढे (जि.प. नाशिक), हर्षदा कडू (जि.प. वर्धा), उमेश राठोड (जि.प. यवतमाळ), निशा केवटे (जि.प. पालघर), प्रफुल मोहोकार (जि.प. नाशिक), भाग्यश्री दुधे (जि.प. वर्धा), वैभव ठाकरे (जि.प. नाशिक) आणि अक्षय ठाकरे (न.पा. काटोल) यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. अभिजीत मेंढे सर, सहायक प्राध्यापक, इतिहास विभाग यांनी विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांच्या तयारीबाबत मार्गदर्शन केले. योग्य नियोजन, नियमित अभ्यास, सातत्य आणि आत्मविशास या बाबी यशासाठी महत्त्वाच्या असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच डॉ. दुर्गेश बोरसे सर, शैक्षणिक समन्वयक व सहायक प्राध्यापक, इंग्रजी विभाग यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून स्पर्धात्मक परीक्षांसाठी आवश्यक कौशल्यांवर भर दिला. शिक्षक दिनानिमित्त डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवन चरित्रावर बी.एस्सी. भाग–२ ची विद्यार्थिनी कु. ऐशर्या धायगुडे हिने भाषण केले. तसेच एम.एस्सी. भाग–१ ची विद्यार्थिनी कु. बरखा मोहोड हिनेदेखील तिचे विचार मांडून शिक्षक दिनाचे महत्व विषद केले. यावेळी गणित विभागाचे विभागप्रमुख डॉ. सुमेध थूल सर यांनी इंडक्शन प्रोग्राम संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयीन जीवनातील शैक्षणिक संधी, विद्यार्थ्यांची भूमिका आणि भविष्यातील करिअरच्या दृष्टीने योग्य दिशादर्शनाचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. तसेच प्राध्यापक डॉ. रामकृष्ण धायगुडे सर यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी आवश्यक असलेल्या विविध बाबींवर मार्गदर्शन केले. अभ्यासाचे योग्य नियोजन, नियमित सराव आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविता येते, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणितीय सोसायटीच्या अध्यक्षा कु. अनम फातिमा आणि वर्गप्रतिनिधी कु. नायरीन अंबर यांनी प्रभावीपणे केले. कार्यक्रमाच्या शेवटी गायत्री सानप यांनी उपस्थित मान्यवर, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले. यावेळी संस्थेचे संचालक माननीय डॉ. केशव तुपे सर यांनी पवित्र पोर्टलद्वारे निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाची वाटचाल अशीच पुढे सुरू ठेवावी, असेही त्यांनी सांगितले. शिक्षक दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी प्रेरणा मिळाली. पवित्र पोर्टलद्वारे निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांच्या यशाचे कौतुक करण्यात आले. या विद्यार्थ्यांचे यश संस्थेतील इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी असून त्यांच्या पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी हा कार्यक्रम निश्चितच मार्गदर्शक ठरला.

# अमरावती स्त्री रुग्णालय बालक मृत्यू प्रकरण; ५ अधिकारी निलंबित, चौकशी अहवाल सादर

मुंबई, : अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात शिशू विशेष काळजी कक्षात (एसएनसीयू) २४ ऑगस्ट रोजी लागलेल्या आगीत तीन बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या घटनेची उच्चस्तरीय चौकशी पूर्ण झाली आहे. याप्रकरणी आरोग्य सेवा उपसंचालक, रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक, प्रशासकीय अधिकारी आणि वीजतंत्री यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याचे आदेश सरकारकडून देण्यात आले आहेत.

अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयातील बालकांच्या मृत्यूचा चौकशी अहवाल शासनास सादर झाल्यानंतर अहवालाच्या आधारे दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आदेश सार्वजनिक आरोग्य विभागाने दिले आहेत. या दुर्घटनेत ३६ बालकांना तातडीने अन्य रुग्णालयांमध्ये सुरक्षित हलविण्यात आले होते. चौकशी समितीच्या अहवालानुसार व्हेंटिलेटरची वेळोवेळी आवश्यक देखभाल व दुरुस्ती न होणे, फायर अलार्म व तुषार यंत्रणा कार्यान्वित नसणे, अग्निशमन पंप हाऊस कुलूपबंद स्थितीत असणे तसेच उपकरणांच्या देखभाल व तांत्रिक तपासणीत गंभीर त्रुटी आढळून आल्या आहेत.



या प्रकरणी कामकाजातील हलगर्जीपणा, बेजबाबदार वर्तन, पर्यवेक्षीय नियंत्रणातील त्रुटी आणि अक्षम्य दुर्लक्ष यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ८ नुसार शिस्तभंगाची कारवाई सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले.

कंत्राटी कर्मचाऱ्यांवरही प्रशासकीय कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले असून सार्वजनिक बांधकाम विभागातील दुर्घटनेस जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबतही आदेश देण्यात आले आहेत. पर्यवेक्षीय नियंत्रणातील त्रुटींसाठी प्रथमदर्शनी जबाबदार ठरविण्यात आलेले उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला परिमंडळ; रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक, स्त्री रुग्णालय अमरावती; अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक, अमरावती; प्रशासकीय अधिकारी आणि वीजतंत्री, स्त्री रुग्णालय अमरावती यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत.

**संबंधित कंपन्यांवरही कारवाई**

चौकशी समितीच्या अहवालात मेसर्स/ एओव्ही इंटरनॅशनल एलएलपी ही कंपनी दोषी आढळल्याने तिला काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच शिलार कंपनीच्या सेवांमध्येही प्रथमदर्शनी दोष आढळून आल्याने फॉरेन्सिक अहवाल तातडीने प्राप्त करून संबंधित कंपनीलाही काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**रुग्णालयांच्या सुरक्षेसाठी व्यापक उपाययोजना**

भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी शासनाने राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये सुरक्षा उपाययोजनांना अधिक बळ देण्याचा निर्णय घेतला आहे. .आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर यांनी सार्वजनिक बांधकाम, विद्युत, अग्निशमन, जैव-तांत्रिक आणि देखभाल-दुरुस्ती यंत्रणांच्या नियमित बैठका घेऊन रुग्णालयांच्या सुरक्षेचा आढावा घ्यावा, तसेच आवश्यक त्या उपाययोजनांवर प्रभावी नियंत्रण ठेवावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि महानगरपालिका आयुक्तांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व रुग्णालयांचे विद्युत व अग्निसुरक्षा ऑडिट तीन महिन्यांच्या आत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सार्वजनिक तसेच खासगी रुग्णालयांमध्ये फायर ऑडिटची अंमलबजावणी, देखरेख आणि अनुपालन अहवाल सादर करण्याची जबाबदारी जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या माध्यमातून सुनिश्चित करण्याच्या सूचनाही आरोग्य सेवा आयुक्तांना देण्यात आल्या आहेत.

## धारखोरा धबधब्यात बुडून तरुणाचा मृत्यू

बेलोरा : मध्यप्रदेश सीमेलगत असलेल्या धारखोरा धबधब्यात बुडून बेलोरा येथील एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना बुधवारी उघडकीस आली. कृष्णा पिंट्या बोबडे (१६) रा. बेलोरा असे मृतक तरुणाचे नाव आहे. कृष्णा हा बेलोरा येथून काही मित्रांसमवेत ८ सप्टेंबररोजी धारखोरा धबधब्याकडे गेला होता. पोहण्याची इच्छा झाल्याने त्याने पाण्यात उडी मारली; मात्र तो परत वर आलाच नाही. बुधवारी दुपारी १२ वाजताच्या दरम्यान त्याचा मृतदेह सापडला. कृष्णाच्या मृत्यूमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## दंडात्मक कारवाईसह परिवहन विभागाची कामे बंद होणार

अमरावती : प्रादेशिक परिवहन कार्यालयाद्वारे दि. १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व जुन्या वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसवणे अनिवार्य करण्यात आले आहे. एचएसआरपी बसविली नसल्यास दंडात्मक कारवाईसह परिवहन विभागाची कामे बंद होणार आहे. केंद्र सरकारच्या केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५० नुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. जुन्या वाहनांवर एचएसआरपी बसवण्यासाठी शासनाकडून दि. ३० जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. ही मुदत संपल्यामुळे वाहनधारकांनी किंवा शासकीय कार्यालयांनी अद्याप नंबर प्लेट बसवलेली नाही अथवा अपॉइंटमेंट घेतलेली नाही, अशा वाहनांवर दि. १ जुलैपासून कारवाईचे निर्देश देण्यात आले आहे. वायुवेग पथकाद्वारे १ जुलैपासून मोटार वाहन अधिनियमातील नियम ५० व कलम १७७ नुसार थेट कारवाई केली जाणार आहे. तसेच एचएसआरपी बसविलेली नाही अशा वाहनांची परिवहन विभागाद्वारे कामे पूर्णपणे थांबवली जातील. यात वाहन हस्तांतरण, नोंदणी प्रमाणपत्रात बदल, फायनान्सचा बोझा चढवणे किंवा उतरवणे, ना-हरकत प्रमाणपत्र जारी करणे, दुय्यम नोंदणी प्रमाणपत्र देणे यांचा समावेश राहणार आहे. मात्र ज्या वाहनधारकांनी एचएसआरपी बुकिंग केल्याची पावती कार्यालयात सादर केली आहे


# ग्राम पंचायत कार्यालय झिल्पी

## पं.स. धारणी, जि. अमरावती

## -निविदा सूचना-

सरपंच /सचिव ग्रामपंचायत कार्यालय झिल्पी यांच्या वतीने बी-१ पद्धतीने योग्य त्या वर्गवारीतील पंजीबद्ध कंत्राटदाराकडून निविदा मागविण्यात येत आहे. खालील कामाची निविदा बी-१ पद्धतीने सादर करावयाची आहे. विस्तृत माहिती ग्रा.पं.च्या नोटीस बोर्डवर लावण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | सन | योजनेचे नान्व | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | गावांना पाणी पुरवठा स्विच रुम तयार करणे | सन २०२५-२६ | १५ वा वित्त आयोग योजना | १, ५०,०००/- |
| २ | वाढीव पाईप लाईन दुरुस्ती | सन २०२५-२६ | बंधीत | ३, ००,०००/- |
| ३ | जि.प. रंगरंगोटी व बोलकी करणे व दुरुस्ती करणे. | सन २०२५-२६ | अबंधीत | २, ५०,०००/- |
| ४ | नवीन रेनवॉटर हार्वेस्टिंग स्ट्रक्चरची निर्मिती | सन २०२५-२६ | बंधीत | १, ३५,०००/- |
| ५ | सार्वजनिक संस्थामध्ये शौचालय दुरुस्ती अंगणवाडी बांधणे | सन २०२५-२६ | बंधीत | ९०,०००/- |
| ६ | सार्वजनिक संस्थामध्ये शौचालय मुतारी दुरुस्ती जि.प. शाळा बांधणे. | सन २०२५-२६ | बंधीत | १, ५०,०००/- |
| ७ | अंगणवाडी रंगरंगोटी व दुरुस्ती करणे. | सन २०२५-२६ | अबंधीत | १, ५०,०००/- |

**१) कोरी निविदा उचलण्याची दिनांक - १०/०९/२०२६ ते दि. १५/०९/२०२६**

**२) भरलेल्या निविदा जमा करण्याची तारीख - १०/०९/२०२६ ते दि. १५/०९/२०२६**

**३) निविदा उघडण्याची दिनांक - मासिक सभेत उघडण्यात येईल.**

**टिप :-**

१. निविदेच्या अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालयाच्या सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात आल्या आहे.
२. निविदा ह्या दोन लिफाफे पध्दतीने सादर करावयाच्या आहेत.
३. कोणतेही कारण न दर्शविता निविदा स्विकारण्याचे तसेच रद्द करण्याचे अधिकार ग्रामपंचायत कार्यालयाकडे राखुन ठेवण्यात येत आहे.

**सरपंच/सचिव**
**ग्रामपंचायत कार्यालय झिल्पी,**
**पं.स. धारणी. जि. अमरावती**

# नवीन अणूऊर्जा प्रकल्पांमुळे स्वच्छ ऊर्जा निर्मितीत वाढ होणार : मुख्यमंत्री

## * टोरेंट पॉवर आणि जेएसडब्ल्यू एनर्जी लिमिटेड समवेत दोन महत्त्वाचे सामंजस्य करार

## * ४२०० मेगावॅट क्षमतेचे अणुऊर्जा प्रकल्प, ७९ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक

मुंबई : राज्याची स्वच्छ ऊर्जेची गरज पूर्ण करण्यासाठी सौर आणि पवन ऊर्जेच्या वापरात राज्याने लक्षणीय प्रगती केली आहे. अणुऊर्जा हा सक्षम आणि महत्त्वाचा पर्याय म्हणून पुढे आला आहे. राज्याची ऊर्जेची गरज पूर्ण करताना ऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नवीन ऊर्जा प्रकल्पांच्या उभारणीमुळे अणुऊर्जेच्या निर्मिती क्षमतेत मोठी वाढ शक्य होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

यावेळी ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, आमदार अभिमन्यू पवार, ऊर्जा विभागाचे अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, महापारेषणचे अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रम कुमार तसेच महाजनकोचे अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी राधाकृष्णन बी., तसेच समीर मेहता, टोरेंट पॉवर आणि जेएसडब्ल्यू एनर्जी लिमिटेडचे प्रतिनिधी उपस्थित होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, केंद्र सरकारने 'शांती' कायद्याला मान्यता दिल्यानंतर अणुऊर्जा क्षेत्र खासगी क्षेत्रासाठी खुले झाले असून, गुंतवणुकीच्या मोठ्या संधी निर्माण झाल्या आहेत. तारापूर अणुऊर्जा प्रकल्प गेल्या अनेक दशकांपासून देशाची सेवा करत आहे. स्वच्छ ऊर्जा उपक्रमांमध्ये अणुऊर्जेची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. सौर आणि पवन ऊर्जेच्या वापरात राज्याने लक्षणीय प्रगती केली आहे. त्याचबरोबर पंप्ड स्टोरेज प्रकल्पही मोठ्या प्रमाणावर उभारण्यात येत आहेत. टोरेंट पॉवरचा कर्जत येथील प्रकल्पही महत्त्वाकांक्षी ठरणार आहे. तथापि, अखंडित वीजपुरवठ्यासाठी आवश्यक मूलभूत वीजभाराचा विचार करता अणुऊर्जा हा प्रभावी आणि स्वच्छ पर्याय आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.अणुऊर्जा क्षेत्रात राज्याने यापूर्वी केंद्र सरकारच्या तसेच खासगी कंपन्यांसोबत तीन करार केले आहेत. अमेरिकेतील प्रमुख अणुऊर्जा कंपन्यांच्या शिष्टमंडळासोबतही यासंदर्भात चर्चा झाली असून, त्यांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यास उत्सुकता दर्शविली आहे, असे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.देशात विकसित करण्यात आलेल्या स्वदेशी अणुभट्ट्या तसेच थोरियम आधारित तंत्रज्ञानाच्या चाचण्यांमुळे अणुऊर्जा क्षेत्रात नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. हे क्षेत्र उदयोन्मुख असून या क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्यांच्या प्रवासात राज्य शासन सहप्रवासी म्हणून पूर्ण सहकार्य करेल,टोरेंट पॉवर आणि जेएसडब्ल्यू एनर्जी लिमिटेड सोबत झालेल्या या दोन करारांमुळे महाराष्ट्राच्या अणुऊर्जा निर्मिती क्षमतेला आणखी बळ मिळणार आहे. असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस यांनी टोरेंट पॉवर आणि जेएसडब्ल्यू एनर्जी लिमिटेडचे अभिनंदन केले.करारात जेएसडब्ल्यू एनर्जी लिमिटेड यांच्या अणुऊर्जा प्रकल्पाचा समावेश आहे. हा प्रकल्प रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील भिवबुंदर (आगरी गाव) येथे प्रस्तावित असून, त्याची क्षमता ४ ु ७०० मेगावॅट म्हणजेच एकूण २८०० मेगावॅट इतकी आहे. प्रकल्प दोन टप्प्यांत राबविण्यात येणार असून, पहिल्या टप्प्यात १४०० मेगावॅट आणि दुसऱ्या टप्प्यात १४०० मेगावॅट क्षमतेची निर्मिती प्रस्तावित आहे.जेएसडब्ल्यू एनर्जीच्या या प्रकल्पासाठी सुमारे ४४ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून, पहिल्या टप्प्यासाठी २२ हजार कोटी रुपये आणि दुसऱ्या टप्प्यासाठी २२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित आहे. या प्रकल्पातून सुमारे ८ हजार ते १० हजार रोजगाराच्या संधी निर्माण होतील.

# मुख्य न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी यांचा शपथविधी संपन्न



मुंबई : महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी बुधवारी लोकभवन, मुंबई येथे झालेल्या छोटेखानी शपथविधी समारंभात अलाहाबाद उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती पदाची शपथ दिली. शपथ प्रदान केल्यानंतर राज्यपाल, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी पुष्पगुच्छ देऊन न्या. त्रिपाठी यांचे अभिनंदन केले.

मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी न्या. महेश चंद्र त्रिपाठी यांच्या नियुक्तीची राष्ट्रपतींची अधिसूचना व अधिपत्र वाचून दाखवली. राष्ट्रगान वंदेमातरम, राष्ट्रगीत व राज्यगीताने शपथविधी सोहळ्याची सुरुवात झाली तर वंदेमातरम व राष्ट्रगीताने सोहळ्याची सांगता झाली. यावेळी महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर, उपसभापती सचिन अहिर, मंत्री छगन भुजबळ, मंत्री मंगल प्रभात लोढा, मुंबईच्या महापौर रितू तावडे, मुंबई उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती तसेच अलाहाबाद उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती उपस्थित होते.

मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत्त मुख्य न्यायमूर्ती सुजाता मनोहर आणि न्यायमूर्ती मोहित शाह यांसह अनेक मान्यवर या समारंभास उपस्थित होते. न्यायमूर्ती चंद्रशेखर यांची सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती पदी नियुक्ती झाल्यामुळे मुंबई उच्च न्यायालयातील मुख्य न्यायमूर्ती पद रिक्त झाले होते. न्यायमूर्ती रवींद्र घुगे हे मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळत होते.

# सफाई ठेका रिकॉल करणे हाच एकमेव मार्ग, अन्यथा मनपावर वाढणार आर्थिक बोजा

## हायकोर्टाच्या निर्णयानंतर काँग्रेस नगरसेवक अनिल अग्रवाल यांची मागणी रेड्डींना ठेका दिल्यास वार्षिक २० ते २२ कोटी रुपयांचा अतिरिक्त भार पडण्याचा दावा

अमरावती : अमरावती। कोणार्क इन्फ्रास्ट्र[illegible] आलेल्या कचरा संकलन व वाहतूक ठेक्याबाबत नागपूर खंडपीठाने दिलेल्या निर्णयानंतर महापालिकेत राजकीय प्रतिक्रिया तीव्र झाल्या आहेत. काँग्रेस नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी हायकोर्टाच्या निर्णयाचे स्वागत करत सध्याची निविदा प्रक्रिया रिकॉल करून नव्याने निविदा काढण्याची मागणी केली आहे. पी. गोपीनाथ रेड्डी यांना थेट ठेका देण्याऐवजी महापालिकेने आपले आर्थिक हित आणि शहराची स्वच्छता व्यवस्था या दोन्ही बाबींचा विचार करून निर्णय घ्यावा, असे त्यांचे म्हणणे आहे. नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी दावा केला की, रेड्डी कंपनीचे दर कोणार्कच्या तुलनेत प्रतिटन २ हजार रुपयांपेक्षा अधिक होते. त्यांच्या मते, रेड्डींना ठेका दिल्यास महापालिकेचा एकूण खर्च सध्याच्या अंदाजे ३५० कोटी रुपयांवरून ५५० ते ६०० कोटी रुपयांपर्यंत पोहोचू शकतो. त्यामुळे महापालिकेवर दरवर्षी सुमारे २० ते २२ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडण्याची शक्यता आहे. झोननिहाय ठेका पद्धतीची मागणी नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी सात वर्षांच्या एकत्रित सफाई ठेका पद्धतीवरही प्रश्न उपस्थित केले. शहरातील पाचही झोन एकाच ठेक्यात समाविष्ट करूनही स्वच्छता व्यवस्थेत अपेक्षित सुधारणा झालेली नाही, असे त्यांनी म्हटले. त्यामुळे पूर्वीप्रमाणे झोननिहाय ठेके देण्याची मागणी त्यांनी केली आहे. यामुळे जबाबदारी निश्चित करणे सोपे होईल, देखरेख अधिक प्रभावीपणे करता येईल आणि एखाद्या ठेकेदाराच्या कार्यक्षमतेचा परिणाम संपूर्ण शहराच्या स्वच्छता व्यवस्थेवर होणार नाही, असा त्यांचा युक्तिवाद आहे.



हायकोर्टाच्या निर्णयानंतर महापालिकेने रेड्डी यांच्या निविदेचा विचार केल्यास केवळ आर्थिक दर हा पुरेसा आधार ठरू शकत नाही, असेही अग्रवाल यांनी स्पष्ट केले. वाहनांची संख्या व प्रकार, आरसी, वाहनांची मालकी, यंत्रसामग्री, मनुष्यबळ तसेच अन्य तांत्रिक अटींची स्वतंत्रपणे तपासणी करणे आवश्यक आहे. त्यांच्या मते, हायकोर्टाने रेड्डींना थेट ठेका देण्याचे आदेश दिलेले नसून नियमानुसार त्यांच्या पात्रतेचा विचार करण्यास सांगितले आहे. पहिल्याच आमसभेत उपस्थित केले होते प्रश्न नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी सांगितले की, २८ फेब्रुवारी रोजी झालेल्या महापालिकेच्या पहिल्या विशेष आमसभेतच त्यांनी कोणार्कला देण्यात आलेल्या सात वर्षांच्या एकत्रित सफाई ठेक्याच्या प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित केले होते. निर्वाचित सभागृह अस्तित्वात येण्याच्या अगदी आधी तत्कालीन आयुक्त तथा प्रशासक सौम्या शर्मा चांडक यांच्या कार्यकाळात जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात ही प्रक्रिया घाईघाईने अंतिम करण्यात आल्याचा त्यांचा आरोप आहे. त्यानंतर सर्वपक्षीय स्वच्छता अभ्यास समिती स्थापन करण्यात आली होती आणि या समितीत ते स्वतःही सदस्य होते. नगरसेवक अनिल अग्रवाल यांच्या दाव्यानुसार, समितीच्या तपासणीत निविदेतील अटी आणि त्यानंतर करण्यात आलेल्या करारामध्ये अनेक महत्त्वपूर्ण तफावती आढळून आल्या होत्या. काही तरतुदी आणि जबाबदाऱ्यांमध्ये बदल करण्यात आल्याचा आरोप करत त्यांनी सांगितले की, समितीने जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करून कारवाई करण्याची शिफारस केली होती. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. पार्ट-बीच्या मंजुरीलाही केला होता विरोध नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी दावा केला की, सफाई ठेक्याच्या पार्ट-बीला स्थायी समितीकडून मंजुरी देण्यास त्यांनी आणि अन्य नगरसेवकांनी विरोध केला होता. वाद कायम असतानाही पार्ट-बीला मंजुरी मिळाल्यामुळे कोणार्कच्या प्रलंबित देयकांच्या भुगतानाचा मार्ग मोकळा झाल्याचा त्यांचा आरोप आहे. हायकोर्टाच्या निर्णयानंतर आता निविदेपासून ते अंतिम करारापर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेचा नव्याने आढावा घेण्याची मागणी त्यांनी केली आहे.

केवळ करार रद्द नको, जबाबदारीही निश्चित करा नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी म्हटले की, हायकोर्टाच्या निर्णयानंतर केवळ कोणार्कचा करार रद्द करणे पुरेसे ठरणार नाही.

निविदा तयार करणे, तांत्रिक मूल्यांकन करणे आणि अंतिम करारात बदल करण्याच्या प्रक्रियेत सहभागी असलेल्या अधिकाऱ्यांच्या भूमिकेची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. संबंधित कागदपत्रे, तांत्रिक मूल्यांकन आणि निविदेच्या अटींमध्ये करण्यात आलेल्या बदलांची सखोल चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याची मागणी त्यांनी केली.

# ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून विस्तार अधिकाऱ्यांची नियुक्ती

नागपूर : राज्य शासनाने ग्रामपंचातींवर माजी सरपंचाना प्रशासक म्हणून नियुक्त केले होते. परंतु आता त्यांना पदावरून हटवण्यात आले असून त्यांच्या जागी जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अधिनस्त असलेल्या विस्तार अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचे सुधारित आदेश काढलेत.आरक्षण ५० टक्क्यांवर गेल्याने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने ५० टक्केच्या मर्यादेत आरक्षण असलेल्या जिल्हा परिषदांच्या निवडणुका घेण्याचे आदेश दिलेत. राज्यातील अनेक ग्रामपंचायतींमध्येही आरक्षणाची टक्केवारी ५० वर गेली. त्याच प्रमाणे सरपंच पदाच्या आरक्षणाची टक्केवारी ही ५० वर गेले होती. त्यामुळे यांच्या निवडणुका न घेता प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली होती. तर प्रशासकाचा कारभार माजी सरपंचांकडे देण्यात आला होता.

सर्वोच्च न्यायालयाने ५० टक्केच्या मर्यादेत आरक्षण ठेवण्याचे आदेश दिले आहेत. परंतु राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या पद्धतीमुळे अनेक स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये आरक्षणाची टक्केवारी ५० वर गेली. दरम्यानच्या काळात राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचायतींमध्ये ओबीसींना २७ टक्के आरक्षण निश्चित करताना कमाल आरक्षण ५० टक्क्यांवर जाता कामा नये, असे आदेश दिलेत. त्यामुळे हजारो ग्रामपंचायतींमध्ये ओबीसींच्या जागा कमी करून त्या खुल्या प्रवर्गात वर्ग करण्याची वेळ आली.

नुकतीच ही प्रक्रियाही काही ठिकाणी पूर्ण करण्यात आली.

TRiLOGiC
COMPUTERS & SERVICES
Cell no. : 08928399966, 09764399966

गौरव प्रकाशन वृत्तपत्र मालक, प्रकाशक, संपादक - बंडूकुमार श्रीरामजी धवणे यांनी मुद्रक गौरव बं. धवणे यांच्या अनुश्री ग्राफीक्स, चपराशीपुरा अमरावती येथे मुद्रीत करून गजानन नगर नं. १, नवीन बायपास रोड, अमरावती अमरावती-६,येथे प्रकाशित केले. मो. ९९६०२२५२७५ या पत्रातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (कोणताही वाद अमरावती न्याय कक्षेत) Email: gauravprakashan1@gmail.com. (HARD COPY-B/W, PDF- COLOUR)